संचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण औरंगाबाद यांना इंग्रजी भाषेच्या भाषिक कौशल्य विकासासाठी करीता निधी उपलब्ध करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः राप्रधो-४२१७/प्र.क्र.२४/१७ /प्रशिक्षण
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २२ मार्च, २०१८

प्रस्तावना :-

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र विद्या प्राधिकरणाकडे २.१० कोटी (दोन कोटी दहा लक्ष) इतका निधी राज्य प्रशिक्षण धोरणातंर्गत उपलब्ध करुन दिलेला होता. सदर निधीमधून संचालक ,प्रादेशिक विद्या प्राधिकरण औरंगाबाद यांना इंग्रजी भाषेच्या भाषिक कौशल्य विकासासाठी (Continuous Help to the teachers of English from Secondary School - CHESS) करीता उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी राज्य प्रशिक्षण धोरणातंर्गत महाराष्ट्र विद्या प्राधिकरणाकडे उपलब्ध करुन दिलेल्या रुपये २.१० कोटी (दोन कोटी दहा लक्ष) तरतूदीतून शिल्लक असलेली रक्कम रु. २४,५८,५६५/- (रुपये चोवीस लाख अठ्ठावन्न हजार पाचशे पासष्ट फक्त) संचालक ,प्रादेशिक विद्या प्राधिकरण औरंगाबाद यांना इंग्रजी भाषेच्या भाषिक कौशल्य विकासासाठी (Continuous Help to the teachers of English from Secondary School - CHESS) करीता उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२२१२३९४८६३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Baban Ranganath Mali

Digitally signed by Baban Ranganath Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=058a3365edca1bab7b5a512fa9b602a739d12b55819b89fd7154a7a28ccbaa1e, serialNumber=d2974b67a90018e618d5e11ffd00382f063542cc3d866753cfd5a4ad652b1908, cn=Baban Ranganath Mali
Date: 2018.03.22 12:41:33 +05'30'

(बी.आर.माळी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
४. महालेखापाल (लेखा परीक्षा) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
५. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
६. सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
७. कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प) शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती (प्रशिक्षण)